## -: शुध्दीपत्रक :-

## -: चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई भरती प्रक्रिया मार्च २०१९ :-

**पोलीस आयुक्त, नवी मुंबई** यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई (६१) पदांची जाहिरात दि.०२.०९.२०१९ रोजी व पोलीस शिपाई चालक (गट-क) (१०३) पदांची जाहिरात दि.३०.११.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदरची रिक्त पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरीक्षा पोर्टल यांचेमार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. या जाहिरातीत स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधित पोलीस घटक प्रमुखांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल असे स्पष्ट करण्यात आले होते. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत :-

१. **मुददा क्रमांक ५ :-** "ऑनलाईन परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या" ऐवजी **"ऑफलाईन OMR based परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या "** असे वाचावे.

२. **मुददा क्रमांक ११.१३ आणि १३.३** मध्ये " उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल" हे शब्द वगळण्यात येत असून त्या ऐवजी **"उमेदवाराच्या परीक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या लेखी परीक्षा केंद्रावर नमूद दिनांकास उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे."**

३. सदरील जाहिरातीत जेथे जेथे "ऑनलाईन परीक्षा "असे नमुद केले आहे त्या सर्व ठिकाणी **"ऑफलाईन परीक्षा "** असे वाचावे.

४. .**मुददा क्रमांक ८:-** महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक राआधो ४०३९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१-०५-२०२१ अन्वये एसईबीसी हे आरक्षण रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे शासन निर्णय दि.३१.०५.२०२१ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दि.५.७.२०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार एसईबीसी या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागा अराखीव (खुल्या) प्रवर्गात समाविष्ठ करण्यात याव्यात. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता दिलेले आरक्षण रद्द झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते, त्यांच्याकरिता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(i) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार एसईबीसी उमेदवारांचा अराखीव व इडब्ल्यूएस प्रवर्गातून विचार करण्यात यावा व असे करतांना एसईबीसीच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गाकरिता विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांच्या बाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादा व परीक्षा शुल्काची सवलत कायम ठेवण्यात यावी.

(ii) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि.५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ०५.०७.२०२१ मधील परिच्छेद क्र.७ मधील तरतुदींनुसार एसईबीसी वर्गाकरिता राखीव असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरित करुन व एसईबीसी प्रवर्गातुन अर्ज केलेल्या उमेदवारांकडुन **"अराखीव "** अथवा **"आर्थिक दृष्टया मागास"** प्रवर्गाचा विकल्प घेउन पुर्वपरिक्षेचे आयोजन करावे असे नमुद आहे.

(iii) उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरिता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते अशा उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार आर्थिक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ अथवा अराखीव (खुला) यापैकी एक विकल्प निवडावा.

(iv) जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छुक/पात्र असतील तर त्यांनी संकेतस्थळावर जाऊन (EWS) विकल्प निवडावा.

(v) ४(iv) वगळता **EWS न निवडलेल्या** उमेदवारांनी संकेतस्थळावर जाउन अराखीव (खुला) ह्यावर **क्लिक करुन अराखीव (खुला)** पदाचा विकल्प निवडावा.

(vi) एसईबीसी या प्रवर्गातील जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक हा विकल्प निवडतील त्या उमेदवारांनी शारिरिक चाचणीच्या वेळी आर्थिक दुर्बल घटका बाबतचे प्रमाणपत्र सोबत आणावे. जे उमेदवार प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांना पुढील भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. तसेच त्यांना त्यावेळी प्रवर्गही बदलता येणार नाही.

**(vii) सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्गातील उमेदवारांना आर्थिक दृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव (खुला प्रवर्ग) विकल्पाबाबतच्या ईडब्ल्युएस प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्राबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.राआधो४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६-०७-२०२१ मधील तरतुदींनुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

**१. निवड प्रक्रियेमध्ये एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केलेल्या ज्या जाहिरांतीमध्ये ईडब्ल्युएस आरक्षण लागु आहे, अशा निवडप्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्युएस आरक्षण अनुज्ञेय करताना, सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परिक्षांसाठी मार्च २०२० पर्यंत ग्राह्य असणारे ईडब्ल्युएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**२. ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला) असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधित पदांची / परिक्षेची जाहिरात (दोन किंवा अधिक टप्प्यांची परिक्षा असल्यास पुर्वपरिक्षेची ) प्रसिध्द झालेली आहे, त्या जाहिरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्त केलेले नॉनक्रिमीलेयर (NCL) प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राह्य धरण्यात यावे. (सन २०१८-२०१९ या वित्तिय वर्षाचे मार्च २०२० पर्यंत ग्राह्य असणारे).**

(viii) आर्थिक दुर्बल घटक (EWS) व अराखीव (खुला) चा विकल्प घेण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळ **पोलीस कॉर्नर** या बटनवर क्लिक केल्यानंतर **पोलीस भरती २०१९** वर क्लिक करावे. त्यानंतर ज्या उमेदवारांनी नवी मुंबई घटकासाठी आवेदनपत्र सादर केलेले आहे त्या उमेदवारांनी https://mahapolicerc.mahaitexam.in/ या **URL** वर क्लिक करावे व सुचनांप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

**(ix) विशेष सुचना :- प्रत्येक उमेदवाराने वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर जाउन ज्या उमेदवाराने नवी मुंबई घटकांतर्गत आवेदनपत्र सादर केलेले आहेत त्यांनी वरील URL वर क्लिक करुन उमेदवाराने दिलेल्या सुचनांप्रमाणे स्वत:चा password बदल करुन घ्यावा.**

(x) एसईबीसी प्रवर्गातुन अर्ज केलेल्या उमेदवारांना' **अराखीव** ' अथवा "**आर्थिक दृष्टया मागास** " प्रवर्गाचा विकल्प निवडण्याची सुविधा हे शुध्दीपत्रक प्रसिध्द झाल्यापासुन म्हणजेच दि.०५-०८-२०२१ पासुन ते दिनांक १५-०८-२०२१ रोजी २४.०० वा.पर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण :- नवी मुंबई
दिनांक :- ०३ ऑगस्ट २०२१.

(डॉ. जय जाधव)
अध्यक्ष, पोलीस भरती समिती २०१९
तथा पोलीस सह आयुक्त, नवी मुंबई